# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः11.08.2025** **वारःसोमवार**

---

1. देशातल्या सर्वात लांब पल्ल्याच्या नागपूर-पुणे वंदे भारत गाडीसह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते तीन नव्या वंदे भारत रेल्वेगाड्यांचं लोकार्पण
2. खासदारांसाठी नव्याने बांधलेल्या 184 सदनिकांचं पंतप्रधानांच्या हस्ते आज उद्घाटन
3. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंग चौहान आज देशातल्या 30 लाखांहून अधिक शेतकऱ्यांना पीक विम्याचे दावे वितरीत करणार
4. आशियाई 19 वर्षाखालील मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताला 2 सुवर्ण आणि
5. ओडिशातल्या भारतीय खुल्या जागतिक ॲथलेटिक्स स्पर्धेत अण्णू राणी, मुरली श्रीशंकर यांची भालाफेकीत सुवर्णपदकाला गवसणी

**मोदी बेंगळूरू**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल सुमारे 7 हजार 160 कोटी रुपयांच्या बेंगळुरू मेट्रोच्या यलो लाईनचं उद्घाटन आणि 15 हजार 610 कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्याची पायाभरणी केली. आरव्ही रोड, रागीगुड्डा ते बोम्मासंद्रा यांना जोडणाऱ्या या मेट्रो लाईन सह बेंगळुरूचं मेट्रो नेटवर्क 96 किलोमीटर हून जास्त झालं आहे. प्रमुख निवासी, औद्योगिक आणि शैक्षणिक केंद्रांदरम्यान सुलभ वाहतुकीसाठी बेंगळुरू मेट्रोच्या तिसऱ्या टप्प्यात 44 किमीचा उन्नत मार्ग आणि 31 स्थानकं जोडली जाणार आहेत. पंतप्रधानांनी तीन वंदे भारत एक्सप्रेस गाड्या - बेंगळुरू ते बेळगाव, अमृतसर ते श्री माता वैष्णोदेवी कटरा आणि नागपूर ते पुणे - यांना हिरवा झेंडा दाखवला. नागपूर ते पुणे मार्गावरील वंदे भारत रेल्वे च्या शुभारंभाच्या कार्यक्रमासाठी नागपुरात केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी आणि महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांनी यावेळी माध्यमांशी संवाद साधला. विदर्भातून पुण्याला जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त आहे, परंतु सध्या प्रवाशांना महागडी तिकिटे खरेदी करावी लागतात आणि खाजगी वाहनांनी प्रवास करावा लागतो. शिवाय, अशा प्रवासाला जास्त वेळ लागतो. या बाबी लक्षात घेऊन, ही रेल्वे सुरु केल्याबद्दल मुख्यमंत्र्यांनी केंद्र सरकारचे आभार मानले आहेत. पुणे वंदे भारत एक्सप्रेस ही देशातली सर्वात लांब पल्ल्याची वंदे भारत एक्सप्रेस असून या रेल्वेगाडीमुळे नागपूर ते पुणे हे अंतर सुमारे 12 तासांत पूर्ण करता येणार आहे.

**सिंदूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑपरेशन सिंदूरच्या यशाचं श्रेय संरक्षण उत्पादनातील अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या शक्ती आणि मेक इन इंडिया या उपक्रमांना दिलं आहे. बेंगळुरूमध्ये काल एका सभेला संबोधित करताना मोदी म्हणाले की, देशाच्या सशस्त्र दलांनी सीमेपलीकडे असलेल्या दहशतवाद्यांचे तळ नष्ट करून काही तासांतच पाकिस्तानला माघार घेण्यास भाग पाडल्यानं संपूर्ण जगानं भारताचा नवा चेहरा पाहिला आहे.

तंत्रज्ञानात अधिक स्वावलंबनाचं आवाहन करताना, पंतप्रधानांनी 'शून्य दोष, शून्य परिणाम' उत्पादन मानकांवर भर दिला. बंगळुरूने भारताला जागतिक आयटी नकाशावर स्थान दिलं आहे. विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी उदयोन्मुख तंत्रज्ञान

आणि उत्पादनात आता बंगळूरूकडून नेतृत्वाची अपेक्षा आहे. बंगळूरू हे 'नवीन भारताच्या उदयाचे प्रतीक' असल्याचे गौरवोद्गार काढले आणि कर्नाटकातील युवकांच्या आयटी पासून संरक्षण उत्पादन या क्षेत्रातील देशाच्या प्रगतीतील भूमिकेबद्दल कौतुक केलं.

**मोदी सदनिका**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज नवी दिल्लीतील बाबा खरक सिंग मार्गावर खासदारांसाठी नव्याने बांधलेल्या 184 बहुमजली सदनिकांचं उद्घाटन करणार आहेत. लोकप्रतिनिधी म्हणून असणारी जबाबदारी अधिक कार्यक्षमतेने सांभाळता यावी, या दृष्टीनं या संकुलात सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. प्रत्येक सदनिका अंदाजे पाच हजार चौरस फुटांची आहे. यावेळी पंतप्रधान निवासी परिसरात सिंदूर या वृक्षाचं रोप देखील लावतील. त्यानंतर पंतप्रधान श्रमजीवींशी संवाद साधतील आणि मेळाव्याला संबोधित करतील.

**पीक विमा-चौहान**

केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान आज राजस्थानातल्या झुंझुनू इथं एका कार्यक्रमात 30 लाखांहून अधिक शेतकऱ्यांना तीन हजार 200 कोटी रुपयांहून अधिक किमतीचे पीक विमा दाव्यांचं वाटप करणार आहेत. पंतप्रधान पीक विमा योजनेतल्या गेल्या वर्षीच्या खरीप आणि रब्बी हंगामातल्या दाव्यांची भरपाई शेतकऱ्यांच्या खात्यावर थेट जमा केली जाणार आहे. पीएम किसान सन्मान निधी वाटपाच्या धर्तीवर प्रथमच एका कार्यक्रमातून नुकसानभरपाईचं वाटप होणार आहे. राज्यातल्या शेतकऱ्यांना खरिपातल्या नुकसानभरपाईपोटी 809 कोटी तर रब्बीसाठी 112 कोटी असे एकंदर 921 कोटी रुपये मिळणार आहेत.

**राहुल गांधी नोटीस**

काँग्रेस नेते आणि संसदेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना कर्नाटकच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी नोटीस बजावली आहे. 2024 मध्ये लोकसभा निवडणुकीत, काही मतदारांनी दोनदा मतदान केल्याचा दावा राहुल गांधी यांनी केला होता. हा दावा केलेले पुरावे सादर करण्यासंदर्भात राहुल गांधी यांना, कर्नाटकचे मुख्य निवडणूक अधिकारी व्ही. अंबुकुमार यांनी काल नोटीस जारी केली आहे.

**उत्तराखंड दुर्घटना**

उत्तराखंडमध्ये उत्तरकाशी जिल्ह्याच्या हरसिल आणि धराली भागांत अलिकडेच झालेल्या दुर्घटनेनंतर, अजुनही मोठ्या प्रमाणावर मदत, बचाव आणि शोधकार्य सुरू आहे. बचाव कार्यासाठी उत्तराखंड नागरी उड्डाण विकास प्राधिकरण आणि भारतीय लष्कराच्या हेलिकॉप्टरनी एकूण 257 उड्डाणं केली असून, या दुर्घटनेनंतर, आतापर्यंत 1100 पेक्षा जास्त लोकांना सुरक्षित बाहेर काढलं आहे. या दुर्घटनेच्या कारणांचा शोध घेण्यासाठी भूगर्भशास्त्रज्ञांची पथकंही उत्तरकाशी आणि पौरी जिल्ह्यांमध्ये पाठवली गेली आहेत.

**ऑपरेशन सिंदूर**

ऑपरेशन सिंदूर हे तिन्ही सेनादलांमधल्या समन्वयाचं आणि कार्यान्वयन एकात्मकतेचं उदाहरण आहे, असं संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं आहे. ते काल सिकंदराबाद इथं संरक्षण व्यवथापन महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात वरिष्ठ अधिकाऱ्यांना संबोधित करत होते. सशस्त्र दलांमध्ये एकत्र कृतीसाठी आवश्यक धोरणात्मक दृष्टिकोन आणि भविष्यातल्या रुपरेषेबद्दल त्यांनी अधिकाऱ्यांना मार्गदर्शन केलं. याशिवाय सध्याच्या तंत्रज्ञानावर आधारित युगात व्यापक क्षमता विकास, आत्मनिर्भरता आणि संरक्षण क्षेत्रातल्या परिवर्तनात्मक बदलांचं ज्ञान असणं ही काळाची गरज आहे, असं ते म्हणले.

**मोहन भागवत**

आरोग्य आणि शिक्षण ही क्षेत्रे एकेकाळी लोकसेवेची क्षेत्र मानली जात असत, मात्र आता ती सर्वसामान्यांच्या आवाक्याच्या बाहेर गेली असल्याचं मत राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रमुख डॉक्टर मोहन भागवत यांनी काल इंदोर इथं व्यक्त केल. गुरू सेवा न्यास

कर्करोग सेवा केंद्राच्या उद्घाटनावेळी ते बोलत होते. आरोग्य आणि शिक्षण यांच्या होत असलेल्या व्यावसायिकीकरणाविषयी त्यांनी चिंता व्यक्त केली. सेवाभाव आणि कर्तव्याने प्रेरीत संस्थाही नफ्याचा विचार करू लागल्यानं सर्वसामान्य माणूस पायाभूत सुविधांपासून वंचित राहात असल्याची खंतही भागवत यांनी व्यक्त केली. माधव सृष्टी आरोग्य सेवा परियोजनेअंतर्गत गुरूजी सेवा न्यासाच्या वतीनं इंदोरच्या केंद्रात आर्थिक वंचित कुटुंबांना परवडणाऱ्या दरात कर्करोग उपचार देण्याची याजना आहे.

**<u>तुर्की भूकंप</u>**

पश्चिम तुर्कीमध्ये काल संध्याकाळी 6 पूर्णांक 1 रिख्टर क्षमतेचा भूकंप झाला. इस्तंबूल आणि पर्यटनस्थळ असलेल्या इझमीरसह देशाच्या पश्चिमेकडील अनेक शहरांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवले असं तुर्की आपत्ती व्यवस्थापन संस्थेने सांगितले आहे. आत्तापर्यंत कोणतीही जीवितहानी झाल्याचं वृत्त नाही.

**<u>मुष्टियुद्ध</u>**

आशियाई 19 वर्षाखालील मुष्टियुद्ध अजिंक्यपद स्पर्धेत भारताच्या निशा हिनं 54 किलो गटात आणि मुस्कानने 57 किलो गटात सुवर्णपदक तर इतर पाच जणांनी रौप्यपदक मिळवलं. पुरुषांच्या अंतिम फेरीत, राहुल कुंडूने 75 किलो गटात आणखी एक पदक मिळवले. यामुळे भारताच्या सुवर्णपदकांची संख्या 14 झाली आहे, यामध्ये तीन सुवर्ण, सात रौप्य आणि चार कांस्यपदके समाविष्ट आहेत.

**<u>भालाफेक</u>**

भारतीय खुल्या जागतिक ॲथलेटिक्स ब्रॉन्झ लेवल कॉन्टिनेंटल टूर स्पर्धेत भारताच्या अण्णू राणीनं भालाफेक स्पर्धेत सर्वोत्कृष्ट कामगिरी करत विजेतेपदाला गवसणी घातली. ओडिशातल्या भुवनेश्वर इथं सुरू असलेल्या स्पर्धेत काल अण्णू राणीने 62 पूर्णांक 1 शतांश मीटरवर भाला फेकून हा किताब जिंकला. पुरूषांच्या भालाफेक स्पर्धेत, भारताच्या शिवम लोहकरेने 80 पूर्णांक 73 मीटर फेक करत रौप्य पदकाला गवसणी घातली. पुरूषांच्या लांब उडीमध्ये भारताच्या मुरली श्रीशंकरने सर्वोत्कृष्ट कामगिरीसह सुवर्णपदकाला गवसणी घातली.

**<u>रग्बी</u>**

बिहार इथं सुरू असलेल्या आशिया रग्बी एमिरेटस् करंडक या वीस वर्षांखालील रग्बी स्पर्धेत, भारतीय महिला संघाने उझेबिकीस्तानला हरवत कास्य पदक मिळवलं. भारतात पहिल्यांदाच ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

**<u>हवामान</u>**

उत्तरखंड आणि हिमाचल प्रदेश या क्षेत्रांत येत्या सात दिवसांत अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. या दोन्ही राज्यांसाठी आज पावसाचा केशरी बावटा देण्यात आला आहे. त्याचबरोबर पश्चिम बंगाल आणि सिक्कीम या राज्यांतही मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. दिल्ली, चंडीगड, हरियाणा, पंजाब, बिहार, मध्य प्रदेश, तेलंगण आणि अंदमान निकोबार इथंही आज अतिमुसळधार पावसाचा इशारा वर्तवण्यात आला आहे. काही ठिकाणी विजांच्या कडकडाटसह जोराचे वारं सुटण्याचा अंदाजही हवामान वर्तवण्यात आला आहे.

## या बरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.